Impact Factor-8.575 (SJIF)
ISSN-2278-9308

# B.Aadhar

Peer-Reviewed & Refreed Indexed

Multidisciplinary International Research Journal

**December-2022**

ISSUE No - (CCCLXXXI) 381-A

## 75 YEARS OF INDIAN INDEPENDENCE STATUS & GOALS

75 भारत अमृत महोत्सव

हर राह पर बढ़ते कदम

**Chief Editor**
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Executive Editor**
Dr. Archana S. Dahane
Principal
Officiating Principal
Yeshwant Mahavidyalaya, Seloo
Dist. Wardha

**Editor**
Dr. Sandip B. Kale
Assistant Professor & Head
Department of Political Sci.
Yeshwant Mahavidyalaya, Seloo
Dist. Wardha

B.Aadhar

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

PRINCIPAL
Shivaji College
Hingoli. Dist. Hingoli

Shivaji ... Hingoli
Dist. Hingoli

Impact Factor-8.575 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar

Single Blind Peer-Reviewed & Refreed Indexed

**Multidisciplinary International Research Journal**

## December-2022

ISSUE No - (CCCLXXXI) 381-A

## 75th YEARS OF INDIAN INDEPENDENCE STATUS & GOALS

75 भारत अमृत महोत्सव
हर राह पर बढ़ते कदम

**Chief Editor**
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Executive Editor**
Dr. Archana S. Dahane
Principal
Officiating Principal
Yeshwant Mahavidyalaya, Seloo
Dist. Wardha

**Editor**
Dr. Sandip B. Kale
Assistant Professor & Head
Department of Political Sci.
Yeshwant Mahavidyalaya, Seloo
Dist. Wardha

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

Aadhar International Publication
For Details Visit To : www.aadharsocial.com

All rights reserved with the authors & publisher

PRINCIPAL
Shivaji College
..., Dist. Hingoli

Aadhar International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -8.575, Issue NO, (CCCLXXXI) 381 - A
ISSN 2278-9308
December 2022


| | | |
|---|---|---|
| 23 | P.B. Shelley's Poetry an Epitome of Idealism - A Study — Dr. V.A. Ugemuge | 71 |
| 24 | Sant Tukaram: Socio-Musical Reformer — Mr.PrafullaVilasrao Kale | 74 |
| 25 | महिलांचा मानवी अधिकार :- एक दृष्टीक्षेप — प्रा.डॉ.सनिष.एम.कटके | 77 |
| 26 | भारतीय लोकशाही आणि परराष्ट्र धोरण-एक राजकीय मीमांसा — प्रा.राजेंद्र घोरपडे | 82 |
| 27 | लोकशाही यशस्वी करण्यासंदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार — डॉ पद्माकर दागोडे | 87 |
| 28 | आरोग्य – एक मुलभूत हक्क — प्रा. डॉ. सरला वसंतराव मेश्राम | 92 |
| 29 | जनतंत्र की वास्तविक स्थापना के लिये आवश्यक है चुनाव सुधार — डॉ. अर्चना जा पाटील | 95 |
| 30 | भारतीय लोकशाहीपुढील आव्हाने — प्रा.डॉ.माधव केरबा वाघमारे | 97 |
| 31 | कोरोना काळातील सक्षम महिला — प्रा. डॉ. विद्या मुकुंद ठवकर | 101 |
| 32 | भारतीय साहित्यातील मराठी साहित्याकाचे योगदान डॉ.शरणकुमार लिंबाळे — प्रा.रोशना अर्जून जनबंधू | 103 |
| 33 | मानवी प्रतिष्ठेचा आग्रह — डॉ. अरविंद सोमनाथे | 107 |
| 34 | भारतातील वाढता भ्रष्टाचार एक गंभिर समस्या — डॉ.विजया एच. राऊत | 113 |
| 35 | भारतातील लोकशाही आणि प्रसार माध्यमे — डॉ प्रमोद मा आचेगावे | 118 |
| 36 | भारतीय राज्यघटनेतील तीन ही घटकांचे सर्वसमावेशकतेचे तत्व – प्रा. सूनिल लक्षण नेवकर | 120 |
| 37 | भारतीय लोकशाहीत निवडणूक प्रचारामध्ये सोशल मिडीयाची भुमिका — डॉ.शुद्धोधन एस. गायकवाड | 126 |
| 38 | तमिळ भाषा साहित्य समस्या व त्यावरील उपाययोजनाचा अभ्यास — डॉ. प्रमिला हरीदास भुजाडे | 131 |
| 39 | भारतातील पशूपालक धनगर जमातीच्या राजकीय जीवनाचा अभ्यास — Dr. Dhale .S.U. | 136 |
| 40 | मानव आणि पर्यावरण एक दृष्टीक्षेप — श्री. शैलेश जी. मेश्राम | 141 |
| 41 | लोकशाहीची जडणघडण व वर्तमान आव्हाने — डॉ. अशोक तुकाराम खोब्रागडे | 144 |
| 42 | मानवी हक्क आणि भारतीय राज्यघटना — गीतांजली शुद्धोधन नागदेवे | 147 |
| 43 | स्वामी विवेकानन्द के चिन्तन की वर्तमान संदर्भ में प्रासंगिकता — शिवचरण एन.धांडे , Dr.Jayveer Shing | 151 |
| 44 | भारतीय राजकारणातील प्रमुख आव्हाने : जात, भाषा, प्रांतवाद — प्रा. सचिन वानखेडे | 155 |
| 45 | भारतीय संविधानातील मुलभूत अधिकार — सौ. प्रतिभा विश्वनाथ पांचाळ , डॉ. ए. एन. कदम | 159 |




PRINCIPAL
Shivaji College
Hingoli. Dist. Hingoli

B.Aadhar International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -8.575, Issue NO, (CCCLXXX ) 380 - A
ISSN : 2278-9308
December 2022

Shivaji College Dist Hingoli

# भारतातील पशूपालक धनगर जमातीच्या राजकीय जीवनाचा अभ्यास

Dr. Dhale .S.U.
Shivaji College Hingoli mob :9822698318

## प्रस्तावना

भारतीय संस्कृती आणि इतिहास अतिशय प्राचीन आहे. हिंदु धर्म व संस्कृतीमध्ये अनेक धर्म, पंथ निर्माण झाले आहेत. हिंदु धर्मात निर्माण झालेल्या अनेक जातीमध्ये श्रेष्ठ कनिष्ठ असा भेद निर्माण झालेला आहे. यामध्ये कांही जाती प्रगत आहेत तर काही जाती ह्या सर्वच दृष्टीने मागासलेल्या आहेत. आजही भारतात काही भटक्या जाती-जमाती भटक्या अवस्थेमध्ये आहेत. महाराष्ट्रात भटक्या आणि विमुक्त जमातींची एकूण संख्या बेचाळीस आहे. त्यापैकी १४ जमाती या विमुक्त व २८ जमाती ह्या भटक्या जमाती म्हणून ओळखल्या जातात. ह्या जाती जमाती स्थिर स्वरुपात जिवन जगत नाहीत. नेहमी भटकंती करतात. ज्या ठिकाणी थांबायचे त्या ठिकाणी स्वतःचे पाल ठोकतात व झेंड्याचे निशान उभारतात व राहतात. यामध्ये धनगर ही पशुपालक असणारी महत्वाची जमात आहे. महाराष्ट्राचा विचार करता धनगर जमात महाराष्ट्रात सर्वत्र आढळते. पारंपारिक वेषभुषेत, पारंपारिक जीवन जगणारे हे लोक महाराष्ट्राच्या समाजजीवनाशी एकरुप झालेले दिसतात. त्यांच्या देवदेवता, विधी-उत्सव आजही वैशिष्ट्यपूर्ण आहेत. धनगरांचा मुख्य व्यवसाय शेळ्या-मेंढ्या पालनाचा आहे. संपूर्ण भारतात धनगर समाजाची लोकसंख्या जवळपास १६% एवढी असल्याचे दिसुन येते. धनगर जमातीचा विस्तार पाहिला तर हा समाज जगाच्या पाठीवर सर्वत्र विखुरलेला दिसतो. शेळ्या, मेंढ्या, गुरेढोरे पाळणारी मेषपालन करणारी ही जमात सर्वत्र दिसुन येते. भारतातही कन्याकुमारी ते काश्मिरपर्यंत ही जमात सर्वत्र आढळून येते. प्रदेश, प्रांत व भाषापरत्वे धनगर जमातीस वेगवेगळ्या नावाने ओळखल्या जात असले तरी त्यांचे सामाजिक, व्यावसायिक, सांस्कृतिक गुणवैशिष्ट्ये एकच असल्याचे दिसुन येते. रानावनात, निसर्गाशी रममान होणारा, डोंगर दऱ्यात धाडसाने राहणारा, भरपूर शुर पण नम्रपणे वागणारा हा समाज आढळून येतो.

## धनगर जमात

जनगणना १९११ खंड ७ मुंबई या अहवालात धनगर जमाती "दि वर्ड धनगर अनियर्स टू बी ओरिजीनली ए ट्राईब ॲण्ड नॉट ए फक्शन नेम दे हॅव गिवन अप दियर नॉमेडीक हॅबिट्स" याचा अर्थ "धनगर ही मुळातच जमात असून त्यांची भटकंती वृत्ती आजही कायम आहे" असा उल्लेख आढळतो. प्रो. डॉ. सक्सेना व चिपळूणकर यांनी बिब्लियोग्राफी बॉम्बे इलाखा या संशोधन पत्रिकेत धनगरांचा कुरुबा, भारवाड असा उल्लेख करुन मेषपालक व पशुपालक असे म्हटले आहे.[1] तसेच १८९१ साली झालेल्या जनगणनेत भागलपूर विभागातील पूर्णीया जिल्ह्यात धनगरांचा उल्लेख आदिवासी (अबओरिजोनल) असा केला आहे.[2] धनगर हा समाज संपूर्ण भारतभर पसरलेला आहे. प्रत्येक घटकराज्यात वेगवेगळ्या नावाने हा समाज ओळखला जातो. धनगर समाजाच्या अर्थाबद्दल, उत्पत्ती बद्दल अभ्यासकामध्ये अनेक मतभेद आहेत. धनगर समाजाचे अभ्यासक भाऊसाहेब पाटील यांच्या मते, "हिंदू धर्मशास्त्राप्रमाणे मुळ पुरुष हा विष्णु आहे. या विष्णुपासुन ब्रम्हदेवाचा जन्म झाला. ब्रम्हदेवाचा मुलगा मरिची व मरिचीचा मुलगा कश्यप, कश्यपाला सर्व जीवांचा आदि मानले जाते. आदि कश्यपापासून संपूर्ण मानव जातीची निर्मिती झाली. कश्यपाला एकूण ३६ बायका होत्या. त्यापैकी एक धनगराची होती. तिचे नाव सुंदरा होते. इतिहासामध्ये जे ३६ मूळ ऋषी होते त्यापैकी नाथ हा धनगर जातीचा होता."[3] धनगराच्या उत्पत्तीविषयी एक कथा सांगितली जाते ती अशी की, "फार पूर्वी एका वारुळातून शेळ्या आणि मेंढ्याचे कळप निघाले व त्या शेळ्यामेंढ्या शेताची नासाडी करु लागल्या त्या वेळी सर्व शेतकऱ्यांनी भगवान शंकराची प्रार्थना करायला सुरवात केली तेंव्हा शंकराने (महादेवाने) शेळ्या मेंढ्या राखण्यासाठी धनगर निर्माण केला.[4] ऋग्वेद आणि अथर्ववेदामध्ये सुध्दा धनगरांचा उल्लेख असल्याचे मत श.बा. जोशी यांनी मऱ्हाटी संस्कृती या ग्रंथात मांडले आहे."[5] कृ.वा. कुलकर्णी यांच्या मते स. दाडग = (?) धन + कर होय. तर दाते आणि कर्वे या विचारवंताच्या मते, धनगर हे अब्राम्हण जात व त्यातील मेंढपाळ हे मेंढर पाळण्याचा धंदा करतात. शेळ्या मेंढ्या पाळणे हा त्यांचा प्रमुख व्यवसाय म्हणून त्यांना मेंढपाळाची जात (A particular cast) असे म्हणतात.[6] धनगर मुळ भारतीय असुन आदिवासीमध्ये त्यांची गणना केली जाते. शेळ्या-मेंढ्या पालनासाठी त्यांना सतत भटकंती करावी लागते. त्यामुळे हा समाज स्थिर होऊ शकला नाही. पर्यायाने विकासापासून कोसो दूर राहीला आहे. कानडी भाषेत 'दन' असा शब्द आहे. 'दन' या शब्दाचा अर्थ जनावरे असा आहे. जनावरे म्हणजे मेंढरे, बकरी, गाय, म्हशी तसेच कानडी भाषेतील 'गार' किंवा 'कार' या शब्दाचा अर्थ पाळणारे असा आहे. यावरुन कानडी भाषेतील दनगार किंवा 'दनकार' या शब्दावरुन 'धनगर' हा शब्द अस्तित्वात आला असावा. लढवय्या जातीतील काही लोक अडचणीच्या वेळी आपली मेंढरे, गाई व इतर जनावरे घेऊन जंगलात रानात राहत असत. त्यांना धनगर असे म्हटले जाते धन याचा अर्थ लक्ष्मी असाही घेतला जातो म्हणजे धनगर हा लक्ष्मीधर असाही होईल. डॉ. प्रभाकर द्राक्षे यांच्या मते, जगाच्या मध्यपूर्वेकडे व आफ्रिकेत धनगरांचा विस्तार दिसुन येतो. भारतात अश्मयुगाच्या उत्तरार्धात म्हणजेच इ.स. पूर्व १५०० च्या दरम्यान धनगर समाजाविषयी पहिली नोंद मिळते.[7]

## धनगर या शब्दाच्या अर्थ

"धनगर या शब्दाच्या अर्थावरुन व उत्पत्तीवरुन अभ्यासकात मतभेद दिसुन येतात. धनगर म्हणजे 'धन' या आगार असे काहीजण म्हणतात. परंतु ही जमात प्रारंभापासून भटकणारी आणि जेमतेम आर्थिक परिस्थिती असल्यामुळे [illegible] म्हणजे

PRINCIPAL
Shivaji College
Hingoli. Dist Hingoli

B.Aadhar: International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -8.575, Issue NO, (CCCLXXX.) 380 - A
ISSN : 2278-9308
December 2022

धनगर असा लावणे योग्य वाटत नाही.[७] धनगर हे मुळचे भारतीय असून दऱ्या खोऱ्यात, डोंगरात शेळ्या-मेंढ्या पाळणारे व त्या निमित्ताने भटकंती करणारे आहेत.[८] या भटकंती अवस्थेमुळे त्यांना स्थैर्य प्राप्त झाले नाही आणि यामुळेच ते इतर समाजाच्या तुलनेत प्रगती व विकासापासून अजुनही बरेच दूर आहेत.

**धनगर जमातीचा इतिहास**

धनगर समाजाचा इतिहास पाहतांना आपणास प्राचीन कालखंडात डोकावे लागेल. सुरुवातीला मानव दऱ्याखोऱ्यात राहत होता. आपल्या अन्नाची गरज भागविण्यासाठी तो वेगवेगळ्या प्राण्याची शिकार करु लागला. त्यासाठी तो भटकंती करु लागला. त्याचवेळी त्याला कळाले की, ज्या शिकारीसाठी आपण भटकंती करतो त्या प्राण्याला पाळले तर आपली पोटाची समस्या सुटेल. त्यामुळे मानवाची शिकारी संस्कृती बदलून पशुपालक संस्कृती बनली. शेतीचा शोध लागल्यानंतर काही जन (लोक) शेती करु लागले. त्यामुळे भारतात दोन संस्कृती निर्माण झाल्या. एक मुळ पशुपालकाची तर दुसरी कृषी संस्कृती. पशुपालकातही दोन गट निर्माण झाले धनगर व गोपाल. अशा पध्दतीने मानवी जीवनाच्या आरंभापासून धनगर ही जमात अस्तित्वात होती हे सिध्द होते.[९] धनगर जमात ही अतिशय प्राचीन जमात असल्याचा आणखी एक पुरावा म्हणजे दक्षिण आफ्रिकेतील एका जंगलामध्ये गुहेत मिळालेले शिवलिंग.[१०] भगवान शंकर हा आदिदेव, सर्वश्रेष्ठ निर्माता इ. भावना धनगरांमध्ये दृढ आहेत. त्याचा अर्थ असा होतो की, सात हजार वर्षापूर्वी धनगर जमात पृथ्वीच्या पाठीवर भटकत होती हे सिध्द होते.

**धनगर जमातीचे राजकीय जीवन**

प्राचीन भारताच्या इतिहासाचे अवलोकन केल्यास आपणास धनगर समाजातील अनेक राज्य व सम्राट होऊन गेल्याच्या नोंदी पाहवयास मिळतात. प्राचीन भारताच्या इतिहासात पाहिला सम्राट म्हणून ज्यांचा उल्लेख केला जातो तो चंद्रगुप्त मौर्य हा धनगर पुत्र होता.[११] भारतीय संसदेच्या प्रांगणात आजही चंद्रगुप्त मौर्याचा पुतळा आहे आणि त्या पुतळ्याखाली लिहले आहे की, 'Shepherd boy Chandragupta Mourya dreaming of Indian he was to create.'[१२] प्राचीन भारतातील सामर्थ्यशाली साम्राज्य म्हणून सातवाहनांना ओळखले जाते. इ.स. पूर्व २२० मध्ये सिंधूक अथवा सिमुखने या घराण्याची स्थापना केली. या सातवाहनांचा आंध्र असे म्हटलेले आहे. हा वंश भारतातील पौंड्र, मुतीब, शबर, इ. जमाती प्रमाणे एक अवैदीक वंश होता. मुळचा पशुपालक समाज. औंड्र हे पशुपालक असल्याने व त्यांचे दक्षिणेत येणे व नंतर त्या भागात स्थायिक होणे स्वाभाविक होते. त्यातील एक सत्ता म्हणजे सिमुकने स्थापन केलेली होती. म्हणजे यावरुन सातवाहन हे पशुपालक म्हणजे धनगर होते हे सिध्द होते.[१३]

दक्षिण भारताच्या इतिहासात प्रसिध्द असणारे एक साम्राज्य म्हणजे पल्लव साम्राज्य होय. हे साम्राज्य इ.स. ८१५ पर्यंत अस्तित्वात होते. 'पल्लव' हा शब्द 'पालन' या शब्दासाठी पर्यायी आहे. जसे मेंढपाळ याला हिंदी भाषेत मेषपाल असे म्हणतात. याचा अर्थ पाल हा शब्द पशुपालनाशी संबंधीत असून पाल पासून पल्लव म्हणजेच पालन करणारा असा अर्थबोध होतो. पालन करणारा म्हणजे पशुपालक किंवा धनगर होय. म्हणजे पल्लव हे राज्य धनगर वंशाचे होते हे सिध्द होते.[१४] बंगालमध्ये गुप्त साम्राज्याच्या अस्तानंतर ८ व्या शतकात पाल घराण्याची सत्ता गोपाल याने स्थापन केली. तो पालवंशीय राजा होता. गोपालनंतर जवळपास ११ राज्यांनी राज्य केले व सन ११२५ च्या सुमारास मदनपाल या पालवंशीय साम्राज्याचा शेवटचा सम्राट ठरला. हा पालवंशी धनगर होते. 'पाल' हा शब्द 'मेषपाल' चा पर्यायी शब्द आहे. 'पशुपालक व प्रजापालक' असा याचा अर्थ होतो. यावरुन पालवंशीय साम्राज्य पशुपालक धनगर होते हे सिध्द होते.[१५]

धनगर जमातीचा विचार केल्यास भारतात इ.स.पूर्व काळापासून धनगरांचा उल्लेख पाहवयास मिळतो. वेदाच्या चारही भागात धनगर जमातीचा उल्लेख आला आहे. यजुर्वेदात धनगर, करुबा, यादव, अहिर, गवळी ह्या धनगर जमातीचा उल्लेख आलेला आहे. इतिहासपूर्व काळात कुरुवंशीय कुरुबा धनगराच्या पवित्र नगराची नोंद आढळून येते. सम्राट कुरुबाची राजधानी प्रतिष्ठापूर होती. संपूर्ण देशात कुरुवंशाचा प्रचार करण्यासाठी कुरुवाड केंद्रस्थानी केले. कुरवाड म्हणजेच आजचे कर्नाटक राज्य होय.[१६] या काळापासून करुबा, करुवंशीय अशी वेगवेगळी नावे लावून धनगर जमात ओळखली जाऊ लागली. प्राचीन इतिहासात कुरुवंश, कुरुबा, यादव, अहिर, गवळी, मौर्य, औंड्र, पल्लाव व पाल या घराण्यांन विशाल साम्राज्यावर अधिपत्य गाजविले. धनगर समाज केवळ राजकीय बाबतीतच अग्रेसर नव्हता तर या समाजात मेघदुतचा रचनाकार महाकवि कालिदासासारख्या रत्नांनाही जन्म दिला असा प्राचीन इतिहास दैदिप्यमान व प्रेरणादायी आहे.

मध्ययुगीन भारताच्या इतिहासामध्ये सुध्दा अनेक धनगर जमातीतील व्यक्तींनी आपल्या कार्याचा ठसा उमटविलेला आहे. भारतात कर्नाटक मधील विजयनगर या ठिकाणी संगमा या धनगर वंशाच्या राजघराण्याची सत्ता होती. हरिहर उर्फ हुक्का आणि बुक्का या बंधुनी इ.स. १३३६ मध्ये स्वामी विंधारण्य यांच्या मदतीने विजयनगरवर साम्राज्य स्थापन केले. हरिहर-बुक्क हे मुळचे आंध्रप्रदेशातील असावेत हे विधारण्य सिक्का या संस्कृत पुस्तकातून व शिलालेखातून सिध्द होते. हे दोघे बंधु कुरुबा-गौंड या धनगर जमातीतील होते व त्यांच्य वडीलाचे नांव संगम होते.[१७] हे साम्राज्य इ.स. १३३६ ते १६४६ पर्यंत म्हणजे ३१० वर्ष टिकले. याच काळात दक्षिण भारतात कला, संस्कृतीवर या घराण्याचा प्रभाव पडलेला दिसतो. हंपीची वास्तूशिल्प हा त्याचा उत्तम नमुना पाहावयास मिळतो. बाराव्या (१२) शतकात आनंदकोन या धनगराच्या व्यक्तिस जिंजीच्या किल्ल्याजवळ खजिना सापडला. त्या खजीन्याचा खर्च करुन त्याने सैन्य उभारले. देवानुरचे सनपुर पाळेगाराचा पराभव करुन आनंदगिरी हा किल्ला बांधला. इ.स. १२०० ते १६४१ पर्यंत या घराण्याची सत्ता होती.[१८]

कर्नाटकात विजयनगर, कोचीन, पडूकोटा येथील पल्लव राजे कृष्णगिरीचे कुरुबानाडू, मालवंड, वरंगळ, म्हैसून, पूर्व किनाऱ्यावरील चोल प्रांतात कारोभांडेल आणि मालखेड येथे धनगरांचे राज्य होते. कर्नाटकातील बहुतेक राजे पाळेगार, सरदार



PRINCIPAL
Shivaji College
Hingoli. Dist. Hingoli

[illegible] हे धनगर होते. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना करतांना अठरा-पगड जातीतील मावळ्यांना घेऊन केली होती. त्या मावळ्यामध्ये अनेक मावळे हे धनगर होते. त्यामध्ये हटेकरी, देवकर, झेंडे ह्या धनगरांचा समावेश होता. शिवाजी महाराजांसोबत दादाजी काकडे, बळवंत देवकते, इंद्राजी गोरड, मानकोजी धनगर, त्र्यंबकाजी खांडेकर, धनाजी शिंगाडा, येसाजी खरात, निबांजी पाटोला, बनाजी बिरजे, हिराजी शेळके, भवानराव देवकाते, अमदोजी पांढरे, नाईकजी पांढरे, गोदाजी पांढरे यासारखे सरदार स्वराज्याच्या स्थापनेत छ. शिवाजी महाराजांसोबत खांद्याला खांदा देऊन लढल्याची नोंद सापडते.[१९] छ. शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर मराठी राज्य आपण सहज जिंकू अशी आशा बादशहास निर्माण झाली. परंतु त्यांचे हे स्वप्न पूर्ण होऊ शकले नाही. हे स्वप्न पाहतांनाच त्यांचा मृत्यू झाला. महाराणी ताराबाईच्या सैन्यात अनेक धनगर सैनिक व सरदार होते. त्यामध्ये पांढरे, शरयत मुलुख, समशेर बहादूर राजे, देवकाते, बंडगर, शेंडगे, चोपडे, कोळेकर, काळे, गाफणे, वाघमोडे, कोकरे, ओलेकर, पोटावे, पुणकर, सलगर, शेळके, खरात, लांबहते, मदने, हजारे, मासाळ, शिंदे, गाडवे, काकडे, डांगे, शिंगाडे, बारगळ, ढकले, फणसे, बुले, माने, खताळ, बरगे, हाके, रुपनवर, गलांडे, गरुड, भानुसे, सोनवळकर, जांभने, बने, आगलावे, वाघे, वाघमारे, देसाई, देशमुख, इमानदार, मोकाणी या सरदारांचा समावेश होता. बादशहा औरंगजेबाने स्वराज्यावर स्वारी केली तेव्हा छ. राजाराम महाराजांनी सरदारांना वेगवेगळ्या पदव्या बहाल केल्या. त्यामध्ये काही धनगर सदरदारांचाही समावेश होता. त्यात अमीर उल उमराव - सरदार बंडगर, शरमत मुलुक - उत्तमराव पांढरे, सेना बारासहः दिनकर काकडे, वाघमोडे, शहाजात मुलुक - थोरात, समशेर बहादूर - महानवर, फत्तेजंग बहादूर ढोके, विश्वासराव ढमढेरे, विठोजी सलगर यांचा समावेश होता. तर साताऱ्याच्या शाहू महाराजांनी प्रतिष्ठित मानल्या जाणाऱ्या सोन्याच्या साखळ्या घालण्याचा मान इंडिचे बंडगर देशमुखांच्या घराण्यातील स्त्रीयांना दिल्याची नोंद पाहावयास मिळते.[२०] यावरुन हे सिध्द होते की, स्वराज्याच्या स्थापनेत व संरक्षणात तत्कालीन धनगर समाजाच्या सरदारांनी फार मोठी कामगिरी केली ज्याची इतिहासकारांना नोंद घ्यावी लागली.

मध्ययुगीन भारताच्या इतिहासावर ज्या राजकीय घराण्यांनी छाप पाडली त्यामध्ये होळकर घराण्याचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागते. या घराण्यामुळे महाराष्ट्राच्याच नव्हे तर भारताच्या इतिहासाला एक वेगळी दिशा मिळाली आहे. या घराण्यामध्ये मल्हारराव होळकर, अहिल्याबाई होळकर, खंडेराव होळकर, यशवंतराव होळकर, विटोजी होळकर, तुळसाबाई होळकर, भिमाबाई होळकर या राज्यकर्त्यांचा समावेश होतो. छ. शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना केली. त्या स्वराज्याच्या सीमा दिल्लीपर्यंत विस्तारीत करण्याचे कार्य मल्हारराव होळकरांनी केले. इंदोर संस्थान व होळकर साम्राज्याचा संस्थापक मल्हारराव होळकर जातीने धनगर होते.[२२] मल्हाररावांचा मुलगा खंडेराव होळकरांनी आपल्या कारकिर्दीत निजामाचा पराभव केला, २७ नोव्हेंबर १७३८ मध्ये पोर्तुगिजांचा पराभव केला. महाराष्ट्रातील अनेक मोहीमात खंडेरावांनी महत्वाची भूमिका बजावली. दुर्ग, तारापूर व वसईचा किल्ला जिंकला. खंडेरावांनी केलेला पराक्रम पाहून २६ जानेवारी १७३९ रोजी बाजीरावांनी खंडेरावांना शिलेदाराची वस्त्रे दिली.[२३]

मल्हाररावांनी स्थापन केलेल्या होळकरी राज्याला रामराज्याचं स्वरुप प्राप्त करुन देण्याचं कार्य राजमाता अहिल्याबाई होळकरांनी केलं. अहिल्याबाईतील गुणाची पारख करुन मल्हाररावांनी त्यांना आपली सून म्हणून निवडले व पोटच्या मुलीप्रमाणे वागविले. मल्हारराव व खंडेराव मोहीमेवर जातांना सर्व राज्याचा कारभार हा गौतमबाई व अहिल्याबाई पाहत होत्या. त्या उत्तम प्रशासकही होत्या. खंडेरावांच्या अकाली निधनाने त्यांच्यावर आभाळ कोसळले. त्यांनी सती जाण्याचा निर्णय घेतला. परंतू सासरे व सासुच्या आग्रहावरुन त्यांनी निर्णय बदलला. त्यांच्या आयुष्यात जणु काही संकटाची मालीका सुरु झाली होती. परंतू या संकटाचा सामना करुन त्या जनतेच्या लोकमाता झाल्या. त्यांनी मल्हाररावांच्या मृत्यूनंतर राज्याची सूत्रे आपल्या हाती घेतली व लोक उध्दाराची कामे केली. हिमालयापासून ते कन्याकुमारीपर्यंत संपूर्ण भारतात अहिल्याबाईने पाण्याच्या विहीरी, तलाव, घाट, पुल बांधले. अनेक मंदिरे बांधली. अनेक मंदीरांचा जिर्णोध्दार केला. अन्नछत्रे निर्माण केली व राज्याला एक रामराज्याचे स्वरुप प्राप्त करुन दिले. हे करतांना त्यांनी राज्याची सुरक्षाही केली. लुटारुंपासून राज्याची मुक्तता केली. राज्यावर वाईट नजर असणाऱ्या राघोबादादा व महादजी शिंदेना चांगला धडा शिकविला. हे करतांना त्यांनी इंग्रजांचाही धोका ओळखला होता. इंग्रजांचा पराभव करण्यासाठी त्यांनी सर्व देशी सरदारांची मोट बांधण्याचे काम केले होते. हे त्यांच्या इतिहासावरुन सिध्द होते.[२४] अहिल्याबाईच्या कर्तृत्वाची महती तत्कालीन जगात पसरली होती. ब्रिटिश पार्लमेंटने त्यांना अठराव्या शतकातील जगातील सर्वोत्कृष्ट महिला शासनकर्ती असा गौरव केला होता.[२५] मल्हारराव होळकरांचे दत्तकपुत्र तुकोजीराव होळकर यांचे सर्वात लहान चिरंजीव म्हणजे यशवंतराव होळकर.छ. शिवाजी महाराजानंतर स्वतःचा राज्याभिषेक करुन घेणारा तो एकमेव सार्वभौम राजा होता, इंग्रजांना अनेक युध्दात पराभूत करणारे यशवंतराव होळकर हे एकमेव योध्दे होते.[२६] भारतावर इंग्रजांनी १५० वर्षे राज्य केले असे आपण मानले तर जवळपास १७९७ या वर्षी इंग्रजांनी भारतावर सत्ता स्थापन केली. या सत्तेला भारतातून हाकलून देण्याचे कार्य सर्व प्रथम यशवंतराव होळकरांनी केल्याचे दिसून येते. त्यांनी इंग्रजाविरुध्द दिलेला लढा हा इ.स. १८०३ ते १८०६ असा आहे. एवढेच नव्हे तर यशवंतराव होळकरांची कन्या भिमाबाई होळकर यांनी इंग्रजाविरुध्द युध्द पुकारले. अनेक युध्दात इंग्रजांना धूळ चारली व भारताची आद्य महिला क्रांतीकारक म्हणून इतिहासात अजरामर झाली.[२७]

२८ ऑगस्ट २०१६ रोजी लातूर येथील आदिवासी धनगर साहित्य संमेलनात धनगर समाजाची लोकसंख्या ही अडीच कोटी तर मतदार हे दोन कोटी असल्याचे मत नोंदविले आहे. हे प्रमाण महाराष्ट्राच्या एकूण लोकसंख्येच्या १८% एवढे आहे. ७२ विधानसभा मतदार संघात धनगर उमेदवार निवडून येवू शकतो तर ११३ मतदारसंघ धनगर बहुल आहेत. १३ लोकसभा मतदारसंघात धनगर जमातीची लोकसंख्या ही २ ते ६ लाख एवढी आहे असे मत व्यक्त करण्यात आले आहे. महाराष्ट्र विधानसभेतील निवडणुकांचा अभ्यास केल्यास असे दिसून येते की, १९६२ ते १९६७ या विधानसभेच्या काळात गणपतराव देशमुख, तुकाराम शेंडगे व यमाजी सातपुते हे तीन धनगर आमदार निवडून गेले. १९६७ ते ७२ या काळात गण



Shivaji College Hingoli · PRINCIPAL Shivaji College Hingoli. Dist. Hingoli

International Peer-Reviewed Indexed Research Journal | ISSN : 2278-9308
Impact Factor -(SJIF) -8.575, Issue NO, (CCCLXXX.) 380 - A | December 2022

विठ्ठलराव नाईक हे दोन आमदार निवडून येऊ शकले. १९७२ ते १९७८ या काळात गणतराव देशमुख, लेंगरे अण्णासाहेब व मल्हारराव पाहुलकर व विठ्ठलराव हे चार आमदार निवडून आले. १९७८ ते १९८० या काळात गणपतराव देशमुख, अनंतकुमार पाटील, आनंदराव देवकते व विठ्ठलराव नाईक हे निवडून आलेत. १९८० ते १९८५ या कालावधीत गणपतराव देशमुख व पारुताई वाघ हे दोघेच निवडून आलेत तर १९८५ ते १९९० या कालखंडात गणपतराव देशमुख, आनंदराव देवकते, गणपतराव पाटील, काकासाहेब थोरात, पारुताई वाघ हे पाच आमदार निवडुन आले. १९९० ते १९९५ या कार्यकाळात गणपतराव देशमुख, शिवाजीराव शेंडगे, नाना कोकरे, आनंदराव देवकते, गणपतराव पाटील, १९९५ ते १९९९ या काळात नाना कोकरे, विठ्ठलराव नाईक, आनंदराव देवकते, पोपटराव गावडे हे निवडून आले, तर १९९९ ते २००४ या कालखंडात गणपतराव देशमुख,अनिल गोटे, आनंदराव देवकते, पोपटराव गावडे हे निवडून आले. २००४ ते २००९ विधानसभेत गणपतराव देशमुख, प्रकाश शेंडगे, अनिल गोटे, राम शिंदे व हरिदास भदे आमदार होते.[२८]

२०१४ मध्ये धनगर आरक्षणावरुन संपूर्ण महाराष्ट्रात समाजात एकजूट करण्याचा प्रयत्न करण्यात आला. या पार्श्वभूमीवर ही निवडणूक विशेष महत्वाची होती. या निवडणुकीतही पाच पेक्षा अधिक धनगर समाजाचे आमदार निवडून येऊ शकले नाही. सांगोला मतदार संघातून विक्रमाने गणपतराव देशमुख अकराव्या वेळेस शेतकरी कामगार पक्षाकडून निवडून आले. तर दत्तात्रय भरणे राष्ट्रवादी व नारायण पाटील शिवसेनेच्या तिकीटावर निवडून आले. तसेच राम शिंदे कर्जत जामखेडमधून तर धुळे शहरातून अनिल गोटे भाजपाकडून निडवून आले. इ.स. १९६२ ते २०१४ या कालावधीतील निवडणुकांचा अभ्यास केल्यास असे दिसून येते की, एका वेळी पाच आमदारापेक्षा कधीच संख्या समोर गेलेली नाही. तर विधानपरिषदेतही या जमातीमधील काही प्रतिनिधी निवडून गेलेत. यामध्ये अण्णासाहेब डांगे, माधवराव भिकाजी धायगुडे, विजय हनुमंतराव मोरे, प्रकाश शिवाजीराव शेंडगे, रमेश शिवाजीराव शेंडगे, ना.धो. महानोर, अनंतकुमार किशनराव पाटील, रामराव वडकुते, रामहरी गोविंद रुपनवर व महादेव जाणकर हे विधानपरिषदेवर निवडून गेले. यापैकी बोटावर मोजण्याइतकेच लोक मंत्रीपदावर आरुढ झाले. आनंदराव देवकते, शिवाजी बापू शेंडगे, गणपतराव देशमुख, अण्णासाहेब डांगे, यांनी काही काळ मंत्रीपदे भुषविली आहेत तर सध्या प्रा. राम शिंदे व महादेव जानकर हे महाराष्ट्राच्या मंत्रीमंडळात कॅबिनेट मंत्री आहेत. भारतीय संसदेचा इतिहास पाहिला तर महाराष्ट्रातून आजपर्यंत फक्त एकमेव लोकसभेत गेलेला उमेदवार म्हणजे रक्माजी गावडे तेही १९५८ मध्ये बीड लोकसभा मतदार संघातून तर सध्या डॉ. विकास महात्मे हे राज्यसभेवर खासदार म्हणून कार्य करतात.[२९] लोकसंख्येचा विचार केला तर धनगर समाजाचे विधानसभेतील प्रतिनिधीत्व अत्यल्प असल्याचे दिसून येते.

**सारांश**

भारतीय लोकशाही व्यवस्थेत एखादी जात किंवा जात समुह हे राजकीय पक्षाचे सामाजिक आधार बनलेले दिसून येतात. सामाजिक, आर्थिक व राजकीय क्षेत्रातही जातीने आपापल्या संस्था स्थापन केल्या. त्यामुळे आज भारतीय लोकशाही व्यवस्थेत जातीव्यवस्था ह्या पूर्वी कधीही इतक्या सामर्थ्यशाली नव्हत्या तेवढ्या आज सामर्थ्यशाली दिसून येतात. अशा परिस्थितीत महाराष्ट्रात दुसऱ्या क्रमाकाची जात (जमात) म्हणून ओळखली जाणारी धनगर ही जमात पूर्णपणे विखुरलेली दिसून येते. धनगर जमातीत अनेक पोटजाती आहेत. त्यांच्यामध्ये बेटी व्यवहार जमत नाही. त्या स्वत:ला दुसऱ्यापेक्षा श्रेष्ठ समजतात. त्यामुळे त्यांच्यात एकत्वाची भावना निर्माण होऊ शकली नाही. मुळात ही आदिवासी जमात रानावनात शेळ्यामेंढ्या चारून आपला उदरनिर्वाह करणारी, आज या ठिकाणी तर उद्या दुसऱ्या ठिकाणी अशी भटकंती अवस्था यामुळे कायमचा निवारा नाही. घर नाही. त्यामुळे मुले शिकू शकली नाहीत. त्यातून अज्ञानाचे साम्राज्य निर्माण झाले. त्यातच त्यांचे आयुष्य संपून जाऊ लागले. शेळ्यामेंढ्या चारताना होणारा वन्य प्राण्यांचा, माणसांचा व शासकीय अधिकाऱ्यांचा त्रास, संपत चाललेली जंगले व कुरणे, सततचा दुष्काळ यामुळे पारंपारिक व्यवसाय सोडून काही लोक शहराकडे वळले. काहीनी थोड्याफार जमीनी घेऊन स्थिर होण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे त्यांचा संबंध शहरी आधुनिक संस्कृतीशी आला. त्यातून त्यांच्यात थोडाफार बदल झाला. परंतु हे बदलाचे प्रमाण कमी आहे. त्यामुळे त्यांच्यात राजकारणाप्रती उदासिनता दिसून येते. राजकीय जाणीवजागृतीचा अभाव, राजकीय सामाजिकरणाचा अभाव यामुळे त्यांचे राजकारणातील प्रमाण हे फार कमी आहे. यातून जे नेतृत्व पुढे आले त्यांनी कोणत्या ना कोणत्या पक्षाशी किंवा नेत्यांशी आपली नाळ बांधली. व त्यांच्याभोवतीच ते फिरु लागले. त्यामुळे ते सर्वमान्य, सर्वसमावेशक नेते होऊ शकले नाही किंवा त्यांना प्रस्थापित राजकीय व्यवस्थेने होऊ दिले नाही. जे नेतृत्व विधानसभेत गेले त्यांनीही आपल्या कामाचा प्रभाव विधानसभेत प्रभावीपणे पाडल्याचे दिसून येत नाही. धनगर समाजाच्या समस्याविषयी विधानसभेत त्यांच्याकडून फारसे प्रयत्न झाले नाहीत. त्यामुळे महाराष्ट्रातील धनगर समाजाचे राजकारणातील प्रमाण वाढविण्यासाठी वैचारिक व संघटनात्मक कार्य शिक्षित विचारवंत व नेतृत्वाला करावे लागणार आहे.

**संदर्भसुची**

१) गवते, ज्ञानेश्वर, (२०११), धनगरांच्या लोकसाहित्यातील समाजदर्शन, औरंगाबाद, श्री कैलास पब्लिकेशन - १७.
२) कोकणे, प्र.ना., (२०११), महाराष्ट्रातील धनगर अनूसुचित जमात (एस.टी.), पुणे, श्री समर्थ प्रिंटर्स - ४९
३) कोकणे, प्र.ना., (२०११), महाराष्ट्रातील धनगर अनूसुचित जमात (एस.टी.), पुणे, श्री समर्थ प्रिंटर्स - ५५
४) गवते, ज्ञानेश्वर, (२०११), धनगरांच्या लोकसाहित्यातील समाजदर्शन, औरंगाबाद, श्री कैलास पब्लिकेशन - १५.
५) गवते, ज्ञानेश्वर, (२०११), धनगरांच्या लोकसाहित्यातील समाजदर्शन, औरंगाबाद, श्री कैलास पब्लिकेशन - १५.

PRINCIPAL
Shivaji College
Hingoli. Dist. Hingoli

६) गवते, ज्ञानेश्वर, (२०११), धनगरांच्या लोकसाहित्यातील समाजदर्शन, औरंगाबाद, श्री कैलास पब्लिकेशन - १६.
७) गवते, ज्ञानेश्वर, (२०११), धनगरांच्या लोकसाहित्यातील समाजदर्शन, औरंगाबाद, श्री कैलास पब्लिकेशन - १६.
८) दळणर, शिवाजी, (२००३), परभणी जिल्ह्यातील धनगर समाजाचे आर्थिक व सामाजिक अध्ययन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, पीएच.डी. पदवीकरीता सादर शोधप्रबंध. ३३.
९) सोनवणी, संजय, (२०१५), धनगरांचा गौरवशाली इतिहास, पुणे, पुष्प प्रकाशन - ३५.
१०) येडेकर, श्याम, (२०१३), मी धनगर, कोल्हापुर, राधिका एंटरप्राईजेस - ०३.
११) लोंढे, डॉ. प्रभाकर, (२०१६), 'धनगरांची राजकीय दुरावस्था', नागपुर, सिरली ग्राफिक्स - ६७.
१२) सोनवणी, संजय, (२०१५), धनगरांचा गौरवशाली इतिहास, पुणे, पुष्प प्रकाशन - ३५.
१३) सोनवणी, संजय, (२०१५), धनगरांचा गौरवशाली इतिहास, पुणे, पुष्प प्रकाशन - ६०.
१४) लोंढे, डॉ. प्रभाकर, (२०१६), 'धनगरांची राजकीय दुरावस्था', नागपुर, सिरली ग्राफिक्स - ६३.
१५) लोंढे, डॉ. प्रभाकर, (२०१६), 'धनगरांची राजकीय दुरावस्था', नागपुर, सिरली ग्राफिक्स - ६५.
१६) कोकरे, संजय. (संपादक), (१९९८), 'इतिहास धनगरांचा', मुंबई, सिध्दीविनायक आर्टस, १०.
१७) येडेकर, श्याम, (२०१३), मी धनगर, कोल्हापुर, राधिका एंटरप्राईजेस - ५९.
१८) येडेकर, श्याम, (२०१३), मी धनगर, कोल्हापुर, राधिका एंटरप्राईजेस - २५.
१९) कोळेकर, हरिभाऊ, (२०१४), 'धनगरांचे राजकारण', बार्शि (जि. सोलापुर), अहिल्या प्रकाशन - ३६.
२०) येडेकर, श्याम, (२०१३), मी धनगर, कोल्हापुर, राधिका एंटरप्राईजेस - ८५.
२१) तमनर, विजय, (संपादक), (२०१७), 'पिवळं वादळ,' राहूरी, गणेश प्रिंटर्स - १६.
२२) जारिंगे, श्रीकांत, (२०१५), 'क्रांतीची मशाल पेटवा', नागपुर, ब्ल्यू कॅनॉन पब्लिकेशन - ४०.
23) कोळेकर, हरिभाऊ, (२०१५), 'होळकर राजघराण्यातील होळकर स्त्रीरत्ने', सोलापूर, अहिल्या प्रकाशन - ११.

PRINCIPAL
Shivaji College
Hingoli. Dist. Hingoli